महाराष्ट्र शासन
बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय
पोलीस उप आयुक्त, पश्चिम विभाग–१, मुंबई
तथा सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९

प्रेस नोट

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडून दिनांक ३१/०७/२०२६ रोजी महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ च्या कलम ४० मधील तरतुदींनुसार निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व १५ परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांची त्यांच्या संबंधित कार्यक्षेत्राकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, पश्चिम विभाग–१, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील अर्जदार श्री. प्रकाश दिगंबर देवधर व श्रीमती. प्रभा प्रकाश देवधर, रा. वांद्रे (पूर्व), मुंबई यांनी त्यांचे मालकीचे फ्लॅट नं. सी/४०८, जय को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., नेहरू रोड, सांताक्रुज (पूर्व), मुंबई येथील सदनिकेचा नोंदणीकृत लीव्ह अँड लायसन्स कराराचा ३६ महिन्यांचा कालावधी संपुष्टात येऊनही प्रतिवादींनी सदर सदनिकेचा रिकामा व शांततापूर्ण ताबा परत दिला नसल्याबाबत दिंनाक १६/१०/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज सादर केला होता.

नमूद अर्जाच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, पश्चिम विभाग–१, मुंबई यांनी महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ च्या कलम ४३ सह वाचता कलम २४ अन्वये निष्कासन अर्ज क्र. ०१/२०२६ दाखल करून प्रतिवादींना दिंनाक २४/१०/२०२६ रोजी समन्स जारी केले.

सदर प्रकरणामध्ये अर्जदार व प्रतिवादी यांनी सादर केलेले अर्ज, लेखी म्हणणे, नोंदणीकृत लीव्ह अँड लायसन्स करार व अन्य संबंधित कागदपत्रांचे अवलोकन करून सक्षम प्राधिकारी यांनी प्रकरणाची कायदेशीर तरतुदींनुसार सुनावणी घेतली.

सदर सुनावणीअंती प्रतिवादींना निष्कासन अर्जास विरोध करण्यासाठी परवानगी मिळण्याकरिता केलेला अर्ज नामंजूर करण्यात आला असून, अर्जदारांचा निष्कासन अर्ज मंजूर करण्यात आला आहे. तसेच प्रतिवादींना नमूद सदनिकेचा रिकामा, शांततापूर्ण व प्रत्यक्ष ताबा सर्व चाव्यांसह अर्जदारांना तात्काळ सुपूर्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ च्या कलम २४(२) मधील तरतुदींनुसार कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर दिनांक ०१/०९/२०२६ पासून सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा अर्जदारांना सुपूर्द करेपर्यंत प्रतिवादींना करारातील मासिक परवाना शुल्काच्या दुप्पट दराने, नुकसानभरपाई अदा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच अनामत रक्कम परत मिळण्याबाबत प्रतिवादींचा दावा स्वतंत्रपणे कायदेशीर मार्गाने निकाली काढण्यास मुभा देण्यात आली आहे.

सदर कार्यवाही पोलीस उप आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, पश्चिम विभाग–१, मुंबई यांनी महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ मधील तरतुदींनुसार मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) यांच्या मार्गदर्शनाखाली विहीत वेळेत पार पाडली आहे.

महाराष्ट्र शासनाने पोलीस उप आयुक्त यांची सक्षम प्राधिकारी म्हणून केलेल्या नियुक्तीच्या अनुषंगाने करण्यात आलेली ही कार्यवाही निवासी जागांच्या नोंदणीकृत लीव्ह अँड लायसन्स कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर जागेचा ताबा परत मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या वैधानिक प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

नागरिकांना आवाहन :-

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील नागरिकांना निवासी जागेच्या लीव्ह अँड लायसन्स कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर जागेचा ताबा परत मिळण्याबाबत अडचण निर्माण झाल्यास, त्यांनी महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ मधील लागू तरतुदींनुसार संबंधित कार्यक्षेत्रातील पोलीस उप आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा.

दिनांक :- १२/११/२०२६

स्थळ :- मुंबई